पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ
सोलापूर विद्यापीठ
॥ विद्यया संपन्नता ॥
NAAC Accredited-2015
'B' Grade (CGPA 2.62)

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

**Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University, Solapur**

केगाव, सोलापूर - ४१३ २५५, महाराष्ट्र (भारत)

दुरध्वनी क्र. ०२१७-२७४४७७८ / ११३/११५ (११ लाईन्स), फॅक्स : ०२१७-२३५१३००,

संकेतस्थळ: http://su.digitaluniversity.ac.in ई-मेल:, registrar@sus.ac.in bos@sus.ac.in



## अभ्यासमंडळे विभाग

जा.क्र.पुअहोसोविसो/अमंवि/२०२१/ 4118 दि. 11 JUN 2021

प्रति
मा. प्राचार्य/प्राचार्या/संचालक,
कला, वाणिज्य, विज्ञान, अभियांत्रिकी, विधी, शिक्षणशास्त्र व शारीरिक शिक्षण,
औषध निर्माणशास्त्र, आर्किटेक्चर सर्व संलग्नित महाविद्यालये/सर्व संकुले
पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

**विषय : विद्यापीठ वर्धापन दिनादिवशी डॉ. बी. वाय. यादव शिष्यवृत्ती नव्याने सुरु केले बाबत..**

**संदर्भ :** १) डॉ. बी. वाय. यादव, अध्यक्ष, श्री. शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, बार्शी यांचे दि.२५/०२/२०२१ रोजीचे पत्र.
२) दि.३१/०५/२०२१ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेतील ठराव क्र. ०५.

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयास अनुसरून आपणास कळविण्यात येते की, डॉ. बी. वाय. यादव यांनी संदर्भ क्र. १ अन्वये रु.१०१०००/- चा धनादेश विद्यापीठातील गरीब, होतकरु व गरजू मुला-मुलींच्या शिक्षणासाठी विना अट देवून, या रकमेचा विनियोग योग्य त्या उपक्रमासाठी करावा, अशी विनंती विद्यापीठास केली आहे.

या अनुषंगाने तज्ञ समिती गठित करून, सदर समितीच्या अहवालानुसार दि.३१/०५/२०२१ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीसमोर विषय सादर केला असता, व्यवस्थापन परिषदेने सर्वानुमते खालील प्रमाणे ठराव परित केला आहे.

ठराव क्र. ०५ : १) पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठामध्ये गरिब, होतकरू आणि गरजू मुला-मुलींच्या शिक्षणासाठी डॉ. बी. वाय. यादव, अध्यक्ष, श्री. शिवजी शिक्षण प्रसारक मंडळ, बार्शी यांनी धनादेश क्र.१३९०८८ नुसार रु.१०१०००/- देणगी स्विकारण्याबाबत तातडीची बाब म्हणून मा. कुलगुरु महोदयांनी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२(७) अन्वये व्यवस्थापन परिषदेच्या वतीने केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली.

२) डॉ. बी. वाय. यादव पारितोषिक वितरणा बाबत समितीने तयार केलेली नियमावली खालील दुरुस्तीसह स्किारून सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

- सदर नियमावलीमध्ये पारितोषिक ऐवजी शिष्यवृत्ती अशी दुरुस्ती करावी.
- सदर शिष्यवृत्ती ही विद्यार्थी/विद्यार्थीनीस देण्यात यावी.

सदर ठरावाची प्रत व डॉ. बी. वाय. यादव शिष्यवृत्ती प्रदान करण्यासाठीच्या नियमावलीची प्रत आपल्या सुलभ संदर्भासाठी सोबत जोडण्यात आली आहे. सबब, वरील बाब आपल्या अधिपत्याखाली कार्यरत असलेल्या सर्व संबंधितांच्या निर्दशनास अणून द्यावी, ही विनंती.

आपला विश्वासू,

(प्रा. डॉ. वि. भा. घुटे)
प्र. कुलसचिव

सोबत : वरील प्रमाणे.

प्रत : १) मा. कुलगुरु महोदयांचे कार्यालय.
२) मा. प्र-कुलगुरु महोदयांचे कार्यालय.
३) मा. कुलसचिव महोदयांचे कार्यालय.
४) मा. संचालक परीक्षा व मुल्यमापन मंडळ.
५) मा. वित्त व लेखाधिकारी.
६) सर्व प्रशासकीय विभाग प्रमुख.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर
सोलापूर विद्यापीठ
॥ विद्यया संपन्नता ॥
NAAC Accredited - 2015
'B' Grade (CGPA - 2.62)

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

संदर्भ : दि.३१/०५/२०२१ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेतील ठराव क्र. ०५

## डॉ. बी. वाय. यादव शिष्यवृत्ती वितरणाबाबतची नियमावली

१) डॉ. बी. वाय. यादव शिष्यवृत्ती दरवर्षी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळंकर सोलापूर विद्यापीठ परिसरातील सर्व शैक्षणिक संकुले व संलग्नित महाविद्यालयामधील पदवी धारण करणाऱ्या विद्यार्थी/विद्यार्थीनीस देण्यात येईल.

२) सदर शिष्यवृत्ती खालीलक्रमाणे विद्याशाखांना देण्यात येईल,

| अ. क्र. | विद्याशाखेचे नाव |
|---|---|
| १. | विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा |
| २. | वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा |
| ३. | मानवविज्ञान विद्याशाखा |
| ४. | आंतर-विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा |

वरील विद्याशाखांना दरवर्षी रोटेशन (क्रम) प्रमाणे शिष्यवृत्ती वितरीत करण्यात येईल.

३) सदर शिष्यवृत्ती त्या त्या विद्याशाखेतील सर्वात अधिक CGPA गुण मिळवणाऱ्या एका विद्यार्थी/विद्यार्थीनीस देण्यात येईल.

४) सदर शिष्यवृत्तीची रक्कम राष्ट्रीयकृत बॅकेमधून रूपये १ लाख १ हजार रकमेवरील (वार्षिक मुदत ठेवीवरील) येणाऱ्या व्याजाची रक्कम शिष्यवृत्ती म्हणून देण्यात येईल.

५) सदर शिष्यवृत्ती विद्यापीठ वर्धापन दिनानिमित्त देण्यात येईल.

६) शिष्यवृत्ती हे वर्धापनदिना अगोदरच्या वर्षातील त्या विद्याशाखेतील अधिक CGPA गुणावर देण्यात येईल.

प्र.कुलसचिव

विषय क्र.५ पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठामध्ये गरीब, होतकरु आणि गरजू मुला-मुलींच्या शिक्षणासाठी डॉ. बी. वाय. यादव, अध्यक्ष, श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, बार्शी यांनी धनादेश क्र. १३९०८८ नुसार रु.१,०१,०००/- देणगी स्विकारण्याबाबत मा. कुलगुरु महोदयांनी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १२ (७) अन्वये व्यवस्थापन परिषदेच्या वतीने केलेली कार्यवाही माहितीस्तव व डॉ. बी. वाय. यादव पारितोषिक वितरणाबाबत समितीने तयार केलेली नियमावली विचारार्थ.

व्यवस्थापन परिषद
विषय क्रमांक ( 05 )
दिनांक :- 31 MAY 2021

सदर विषयासंदर्भात तातडीची बाब लक्षात घेता, मा.कुलगुरु महोदयांनी केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली तसेच डॉ. बी. वाय. यादव पारितोषिक वितरणाबाबत समितीने केलेली नियमावली स्विकारुन, सर्वानुमते खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

ठराव :

१. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठामध्ये गरीब, होतकरु आणि गरजू मुला-मुलींच्या शिक्षणासाठी डॉ. बी. वाय. यादव, अध्यक्ष, श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, बार्शी यांनी धनादेश क्र. १३९०८८ नुसार रु.१,०१,०००/- देणगी स्विकारण्याबाबत तातडीची बाब म्हणून मा.कुलगुरु महोदयांनी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२ (७) अन्वये व्यवस्थापन परिषदेच्या वतीने केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली.

२. डॉ. बी. वाय. यादव पारितोषिक वितरणाबाबत समितीने तयार केलेली नियमावली खालील दुरुस्तीसह स्विकारुन सर्वानुमते मान्यता देण्यात आली.
- सदर नियमावलीमध्ये पारितोषिक ऐवजी शिष्यवृत्ती अशी दुरुस्ती करावी.
- सदर शिष्यवृत्ती ही विद्यार्थी / विद्यार्थीनीस देण्यात यावी.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर